


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २६९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com


बुलडाणा, रविवार, दि.११ मे २०२५


# अवघ्या ४ तासांत पाककडून शस्त्रसंधीचं उल्लंघन; जम्मू-काश्मीरमध्ये ड्रोन हल्ले अन् गोळीबार

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि .१०, नवी दिल्ली :**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात ८६ तास चाललेल्या संघर्षानंतर शनिवारी संध्याकाळी ५ वाजता शस्त्रसंधीची घोषणा झाली. दोन्ही देशांनी याबद्दलचा निर्णय घेतला. मात्र पाकिस्ताननं अवघ्या ४ तासांमध्ये शस्त्रसंधीचं उल्लंघन केलं. जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्ताननं पुन्हा एकदा गोळीबार सुरु केला आहे. पाकिस्तानकडून ड्रोन हल्लेदेखील केले जात आहेत. श्रीनगरमध्ये स्फोटांचे ४ ते ५ आवाज ऐकू आलेले आहेत. सांभा सेक्टरमध्ये सायरन वाजू लागले आहेत. पाकिस्तानी हल्ल्यांना जशास तसं उत्तर देण्याच्या सूचना सीमा सुरक्षा दलाला देण्यात आलेल्या आहेत.

जम्मू-काश्मीरच्या सीमावर्ती भागात गोळीबार सुरु झाला आहे. शस्त्रसंधीची घोषणा होऊन अवघे तीन तास उलटले आहेत. पण पाकिस्ताननं पुन्हा एकदा आगळीक केली आहे. काश्मीरच्या बाराम ुला जिल्ह्यात संशयास्पद ड्रोनचा स्फोट झाला. अखनूर, राजोरी, आरएसपुरा आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्ताननं उखळी तोफांचा वापर सुरु केला आहे. बारामुलामध्ये ड्रोन हल्ला झालेला आहे.



जम्मूच्या पलनवाला सेक्टरमध्येही शस्त्रसंधीचं उल्लंघन झालेलं आहे. पाकिस्तानी सैन्याच्या गोळीबाराला प्रत्युत्तर देण्याचे आदेश भारतीय सैन्याला देण्यात आले आहेत. पाकिस्ताननं गोळीबार सुरु केल्यानंतर जम्मूतील बहुतांश भागात ब्लॅकआऊट करण्यात आलेला आहे. बारामुलामधील वीज पुरवठा खंडित करण्यात आलेला आहे. श्रीनगरमधील अनेक भागांमध्येही अंधार पसरला आहे.

राजस्थानच्या पोखरणमध्येही मोठ्या संख्येनं ड्रोन दिसत आहेत. हवाई सुरक्षा यंत्रणा त्यांना नष्ट करत आहे. राजोरीमध्येही गोळीबार सुरु आहे. पाकिस्तानच्या गोळीबाराला भारताकडून चोख प्रत्युत्तर देण्यात येत आहे. पाकिस्तानचे ड्रोन्स पाडण्याचं काम हवाई सुरक्षा यंत्रणेकडून केलं जात आहे. भारताची एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणा सलग चौथ्या दिवशी पाकिस्तानचे हल्ले हाणून पाडत आहे. पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचं उल्लंघन करण्यात आल्यानंतर जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी एक्सवर पोस्ट करत संताप व्यक्त केला. शस्त्रसंधीचं काय झालं, असा सवाल त्यांनी विचारला. श्रीनगरमधील अनेक भागांमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू येत असल्याचं अब्दुल्ला यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे. पाकिस्तानच्या गोळीबारामुळे तणाव कायम आहे.

**पंतप्रधान मोदी यांची तिन्ही लष्कर प्रमुखांसह बैठक**



**दि.१०, दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध ताणले गेले. पाकिस्तानकडून सीमेवर गोळीबार केला जात होता. ऑपरेशन सिंदूरच्या म ाध्यमातून भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे कंबरडे चांगलेच मोडले. मात्र, दोन दिवसांपासून पाकिस्तानकडून हल्ला केला गेला. भारताने सडेतोड उत्तर पाकिस्तानला दिले. युद्धाची स्थिती निर्माण झाली होती. शेवटी आज भारत आणि पाकिस्तानमध्ये आता शस्त्रसंधी लावण्यात आलीये. याबद्दलची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दिलीये.

**दिल्लीमध्ये घडामोडींना वेग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बैठक**

भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी लावण्यात आली असली तरीही दिल्लीमध्ये बैठकांचे सत्र सुरू असल्याचे दिसतंय. पडद्यामागील घडामोडींना प्रचंड वेग आल्याचेही बघायला मिळतंय. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, एनएसए अजित डोवाल, सीडीएस आणि तिन्ही दलांच्या प्रमुखांसोबत बैठक घेतली आहे. या बैठकीमध्ये काय ठरणार याकडे संपूर्ण देशाच्या नजरा लागल्या आहेत. मागील काही दिवस सीमेवर अनेक घडाम ोडी घडताना दिसल्या. पाकिस्तानी लष्कराकडून सीमेच्या भागातील नागरिकांना टार्गेट करून गोळीबार करण्यात आला. हेच नाही तर भारतीय लष्कराने सीमा भागातील काही गावे देखील खाली केली होती. पाकिस्तानच्या गोळीबारामध्ये १७ नागरिकांचा जीव देखील गेला. अनेक घडामोडी सुरू असतानाच नरेंद्र मोदी यांनी ही महत्वाची बैठक बोलावली आहे.

## थोडक्यात

### वैनगंगा नदीत ३ भावी डॉक्टर बुडाले



**दि.१०, चंद्रपूर :** एक अतिशय धक्कादायक अशी घटना पुढे येताना दिसतंय. या घटनेने चंद्रपूर शहरात खळबळ उडालीये. आपल्या मित्रांसोबत वैनगंगा नदीमध्ये पोहण्यासाठी आलेले एमबीबीएसचे तीन विद्यार्थी पाण्यात बुडाले आहेत. हे तिन्ही विद्यार्थी जिल्हाबाहेरील असल्याचीही माहिती मिळतंय. या घटनेबद्दल कळताच लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत खूप उशीर झाला. हे विद्यार्थी एमबीबीएसच्या प्रथम वर्षात शिकत होते. पोहण्यासाठी आलेल्या या तिघांवर काळाने घाला घातला.

**आठ मित्र सुट्टीनिमित्त पोहण्यासाठी नदीवर आणि अचानकच...**

मिळालेली अधिक माहिती अशी की, चंद्रपूर गडचिरोली सीमेवरील वैनगंगा नदीत आंघोळीसाठी गेलेले गडचिरोली येथील तीन एमबीबीएसचे विद्यार्थी बुडाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हे तिन्ही विद्यार्थी बाहेर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. गडचिरोली येथे एसबीबीएसच्या प्रथम वर्षात शिकत आहेत. घटनेची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरली आणि पोलिसांसह नागरिकही घटनास्थळी दाखल झाले. सावली पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रदीप पुलरवार हे आपल्या टीमसह घटनास्थळी पोहोचलेले असून पाण्यात बुडालेल्या तिघांचा शोध हा घेतला जातोय. आज शनिवारची सुट्टी असल्याने आठ मित्र वैनगंगा नदीत पोहण्यासाठी आले होते. मात्र, यादरम्यान तिघेजण पाण्यात अचानक बुडाले. दरम्यान पाच जणांना पाण्यातून बाहेर पडण्यास यश मिळाले. मात्र, तिघेजण बुडाले.

### शेगावमध्ये भीषण अपघात !

**दि.१०, बुलढाणा :** जिल्ह्यात दुचाकी चारचाकी आणि मग अवैध रेती, गिट्टी ,विटा यांची वाहतूक करणाऱ्या डंपर ट्रक, ट्रॅक्टरमुळे जिल्ह्यात अपघाताचे सत्र वाढताना दिसत आहे. आज तर मोठी खळबळजनक घटना घडलीये. आजी आजोबाच्या देखत दोन्ही नातवांचा मृत्यू झाला. त्यानंतर संतप्त जमावाने डंपर पेटवून दिल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. सदर घटना आज शेगावजवळ घडली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील पळशी सुपो येथून शेगाकडे येणाऱ्या मोटरसायकलला भेंडवळ जवळील माऊली फाटा येथे भडगाव जाणाऱ्या डंपरने जोरदार धडक दिली. यामध्ये मोटार सायकलवरील दोन चिमुकल्यांचा जागी मृत्यू झाला. तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. सदर अपघातानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाल्यानंतर जमलेल्या जमावाने रस्त्यावर उतरत डंपरला पेटवून दिले. एकीकडे सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या आहे आणि चिमुकले आपल्या आजी-आजोबांकडे उन्हाळ्याच्या सुट्ट्या घालवण्याकरता जात असताना हा भीषण अपघात घडला. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये आजी आजोबांकडे निघालेला पार्थ चोपडे वय वर्षे ६ व युवराज भागवत वय ६ सहा असे अपघातात मृत्यू पावलेल्या चिमुकल्यांचे नावे आहेत. दरम्यान सदर घटना आज दुपारी ११ ते १२ च्या दरम्यान दुपारी जळगाव जामोद तालुक्यात पशी सुपर येथून प्रकाश महादेव खेडकर आणि साधना प्रकाश खेडकर हे पती-पत्नी आपल्या दोन नातवडांना घेऊन शेगावकडे निघाले होते. भरधाव टिप्परने या दुचाकीला इतकी भयंकर टक्कर दिली की, ज्यामध्ये पार्थ आणि युवराज हे मृत पावले. सदर घटना झाल्यानंतर संतप्त जमावाचा राग अनावर झाला आणि त्यांनी अपघात करणाऱ्या या टिप्परला पेटवून दिले. परिस्थिती नियंत्रण आणण्याकरता पोलीस प्रशासन हस्तक्षेप करत पुढील अनर्थ टाळला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# शिर्डीतील साईबाबा मंदिर सुरक्षेत वाढ ! हार - फुले - पाकिटांची देखील तपासणी होणार



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१०, शिर्डी (अहिल्यानगर) :** शिर्डी हे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असल्याने तेथे भाविकांची वर्षभर मोठी गर्दी असते. भारत- पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर साई मंदिराची सुरक्षा यंत्रणा वाढविण्यात आली असून मंदिर परिसरात प्रवेश करताना प्रवेशद्वारावर हार-फुले व पाकिटांची स्कॉनिंग मशिन द्वारे तपासणी करण्यात येत असून गरज भासल्यास अतिरिक्त बंदोबस्त मागवणार असल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

चार ते पाच दिवसांपूर्वी शिर्डीच्या साई संस्थानच्या अधिकृत मेल आयडीवर मंदिर पाईप बॉम्बने उडवून देण्याची धम की मिळाली होती. या धमकीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस व साई संस्थानची सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली होती.

**पोलिस यंत्रणा सतर्क...**

साईमंदिराचे बॉम्बशोध पथक आणि डॉग पथक मंदिर व परिसराची कसून तपासणी करीत आहे. साईबाबा मंदिराचे ९७३ सुरक्षा कर्मचारी आणि पोलिस पथक बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. यासंदर्भात संस्थानच्या सर्व यंत्रणांची बैठक घेऊन सुचना करण्यात आल्या आहेत. परिसरात काही संशयास्पद वस्तू आढळल्यास भक्तांनी संस्थानच्या सुरक्षा यंत्रणेशी संपर्क साधावा. मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सुरक्षा यंत्रणेची आढावा बैठक झाली. त्यासंबंधी मंदिर परिसरातील सुरक्षेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे.

**-- गोरक्षनाथ गाडीलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी साईबाबा संस्थान, शिर्डी**

शिर्डीचे साई मंदिर हे दहशतवाद्यांच्या हिटलीस्टवर असल्याचे काही वर्षांपूर्वी केंद्रीय गुप्तचर विभागाने अहवाल दिला होता तसेच भारत- पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आता मंदिराच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर कधी नव्हे ती भक्तांची तपासणी सुरू झाली.

साई मंदिर सुरक्षेसाठी अतिरिक्त पोलीस की जे नेहमी आपल्याजवळील हत्यारे बाजूला ठेवून खुर्चीवर बसून म ोबाइलमध्ये व्यस्त असतात, तेही सतर्क झाल्याचे पाहावयास मिळाले, स्कॅनिंग मशीनद्वारे पर्स, प्रसादाच्या बॅग,हार, फ ुले यांची तपासणी होत आहे. मंदिरात म ोबाईल कॅमेरे नेण्यास सक्त बंदी करण्यात आली आहे.

# वाहनचालकांना मोठा दिलासा

## नागपुरातील पेट्रोल पंपांवर ऑनलाइन पेमेंट पुन्हा सुरू

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१०, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर आज १० मेपासून ऑनलाइन पेमेंट व्यवहारांवर लावलेल्या बंदीचा निर्णय मागे घेण्यात आल्याने हजारो वाहनचालक आणि ग्राहकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. विदर्भ पेट्रोलियम डीलर्स असोसिएशनने काही दिवसांपूर्वी सायबर फसवणुकीच्या घटनांचा हवाला देत पेट्रोल पंपांवर कोणतेही डिजिटल व्यवहार स्वीकारले जाणार नाहीत, असा निर्णय घेतला होता. मात्र प्रशासनाच्या सूचनेनंतर आणि ग्राहकांच्या अडचणी लक्षात घेता हा निर्णय आता मागे घेण्यात आला आहे.




विदर्भ पेट्रोलियम डीलर्स असोसिएशननुसार, फोन पे, गुगल पे, पेटीएम, तसेच डेबिट आणि क्रेडिट कार्डद्वारे होणाऱ्या व्यवहारांमुळे अनेक पेट्रोल पंपचालकांना बँक खात्यांमध्ये तांत्रिक अडचणी आणि फसवणुकीला सामोरे जावे लागत होते.

काही प्रकरणांमध्ये लाखो रुपयांची रक्कम बँकांनी गोठवली होती आणि काही खात्यांच्या व्यवहारांवर पूर्ण बंदी घालण्यात आली होती. ही रक्कम परत मिळवण्यासाठी गृहमंत्रालयाची परवानगी आवश्यक असल्याने पंपचालकांची मोठी गैरसोय झाली होती. कोविडनंतर डिजिटल व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

नागपूर शहरात दररोज हजारो ग्राहक पेट्रोल पंपांवर विविध ॲप्सद्वारे पेमेंट करतात. मात्र, ग्राहकांचे खात्रीशीर तपशील आणि व्यवहाराची खरी माहिती न मिळाल्याने काही वेळा बनावट व्यवहार घडल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पंपचालकांनी काळजी घेत ही तात्पुरती बंदी घातली होती. या निर्णयामुळे अनेक ग्राहकांना रोख रक्कम घेऊन पेट्रोल भरणे भाग पडत होते, ज्यामुळे गैरसोयींचा साम ना करावा लागत होता.

दरम्यान, देशातील आर्थिक सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य प्रशासनाकडून सर्व व्यवहार सुरळीत सुरू ठेवण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, डीलर्स असोसिएशनने सामाजिक जबाबदारी जपत आणि ग्राहकांच्या सोयीसाठी ऑनलाइन पेमेंट पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर जिल्ह्यातील ग्राहक आता पूर्वीप्रमाणेच आपल्या पसंतीच्या ॲप्सद्वारे सहज आणि सुरक्षितपणे पेट्रोल पंपांवर पेमेंट करू शकतील. यामुळे रोख व्यवहारांची अडचण दूर होऊन, डिजिटल व्यवहारांद्वारे सुलभ सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.




## भारतीय तंत्रज्ञान




आजच्या दिवशी- दि.११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे.अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली मोलाची कामगिरी केली. ती कामगिरी राजस्थान येथील भारतीय लष्कराच्या पोखरण चाचणी क्षेत्रातील होती. त्यात शक्ती-१ या आण्विक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीपणे पार पाडली गेली. या प्रगतीचे प्रतीक ११ मे हा दिवस दरवर्षी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. याशिवाय याच काळात देशातच विकसित झालेल्या पहिल्या स्वदेशी विमान हंस-१ने पहिले उड्डाण बेंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे विमान नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीजने विकसित केले होते. तसेच कमी पल्ल्याचे, जलद- प्रतिक्रिया देणारे, जमिनीवरून हवेत मारा करणारे- एसएएम क्षेपणास्त्र- त्रिशूल हा भारतातील गाइडेड क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचा एक भाग होता. देशाच्या या प्रचंड यशानंतर भारताचे तत्कालीन माजी पंत्रप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस म्हणून घोषित केला. भारतात सन १९९९पासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास मंडळ यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो.

दि.११ मे १९९८ रोजी भारतात यशस्वी अणुचाचणी घेण्यात आली होती. त्यानंतरच अण्वस्त्रे असलेल्या देशांच्या यादीत भारताचे नाव समाविष्ट झाले. भारताने ऑपरेशन शक्ती अंतर्गत राजस्थानच्या पोखरण येथे यशस्वी अणुचाचणी केली. त्यानंतर १३ मे रोजी दोन विभक्त चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांचे नेतृत्व माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे. अब्दुल कलाम यांनी केले. त्यानंतर दि.११ मे १९९९ रोजी प्रथमच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा करण्यात आला आणि तेव्हापासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जाऊ लागला. या दिवसाची घोषणा तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केली होती. या दिवसापासून आजपर्यंत तंत्रज्ञान विकास मंडळाने तांत्रिक क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल शास्त्रज्ञ व अभियंत्यांना सन्मान व प्रोत्साहन दिले आहे. वैज्ञानिक, डीआरडीओ- संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, भाभा अणुसंशोधन केंद्र- बीएआरसी आणि एएमडीईआर- अणू खनिज संचालनालय अन्वेषण आणि संशोधन यांनी यशस्वीरीत्या चाचणी केली. हेच कारण होते ज्यामुळे भारत थर्मोन्यूक्लियर शस्त्रे तयार करण्यास सक्षम बनू शकला.

आज नॅशनल टेक्नोलॉजी डे- राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून भारतासाठी आजचा दिवस खास आहे. हा दिवस भारतासाठी अनेक कारणांमुळे विशेष आहे. वरीलप्रमाणे एक अतिशय रंजक इतिहास यामागे दडलेला आहे. दरवर्षी ११ मे रोजी राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन साजरा केला जातो. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे योगदान आणि या क्षेत्रात भारताने केलेल्या अतुलनीय कामगिरीची साक्ष देणारा हा दिवस म्हणावा लागेल. दरवर्षी याच दिवशी उत्साहात साजरा केला जातो. तसेच राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाच्या दिवशी हंस-१ या पहिल्या भारतीय विमानाने यशस्वी भरारी घेतली होती. त्याशिवाय डीआरडीओने याच दिवशी त्रिशूल क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणीही केली. हे एक क्षेपणास्त्र आहे जे त्याच्या लक्ष्यावर वेगाने हल्ला करते. हा इतिहास कायम स्मरणात रहावा आणि भारतीय युवापीढी या दिवसाची सदोदित प्रेरणा घेत रहावी. म्हणून हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो, हे विशेष येथे उल्लेखनीय!


**!! भारतीय तंत्रज्ञान दिनानिमीत्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

# मुल म्हणजे 'आई' साठी सर्वस्व असते!

मातृदिन हा आईचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो. दरवर्षी संयुक्त राज्य आणि इतर काही देशांमध्ये मे च्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. १९१२ मध्ये 'मदर्स डे' चे संस्थापक अण्णा जार्विस यांनी 'मे मध्ये दुसरा रविवार' आणि 'मदर्स डे' या म्हणीचा ट्रेडमार्क केला आणि मदर्स डे इंटरनॅशनल असोसिएशनची स्थापना करुन माता आणि मातृत्वाच्या सन्मानार्थ मातृदिन साजरा करण्याची कल्पना सुचविली होती. १९१४ मध्ये तिला राष्ट्रीय मान्यता मिळविण्यात यश आले. तेव्हापासुन या दिवशी लोक आईचा आदर म्हणुन तिला सप्रेम भेट म्हणून एखादी प्रिय वस्तू आणि शुभेच्छा देवून 'मदर्स डे' साजरा करतात. तसेच हा कुटुंबातील किंवा व्यक्तीच्या आईचा तसेच मातृत्व, मातृबंध आणि समाजातील मातांचा प्रभाव यांचा सन्मान करणारा उत्सव आहे. हा जगातील बराच भागांमध्ये विविध दिवसांमध्ये साजरा केला जातो, सामान्यतः मार्च किंवा मे महिन्यांत हा साजरा केला जातो. काही देशात जसे बल्गेरिया आणि रोमानिया येथे जागतिक महिला दिन हा दिवस 'मदर्स डे' म्हणून साजरा केला जातो.

भारतीय संस्कृतीत आधुनिक 'मदर्स डे' आत्मसात करण्यात आला आहे आणि दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजरा केला जातो. भारतीय लोक हा प्रसंग धार्मिक कार्यक्रम म्हणून साजरा करत नाहीत; त्याचा उत्सव मुख्यतः शहरीभागांपुरता मर्यादित आहे जेथे या प्रसंगाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण केले गेले आहे. या दिवशी मुले आई आणि आजी यांना भेटवस्तू देतात. हे अशाच प्रकारच्या उत्सवांना पूरक आहे, मुख्यत्वे व्यावसायिक हितसंबंधांमुळे, कुटुंबातील सदस्यांचा सन्मान करणे, जसे की फादर्स डे, सिबलिंग डे आणि आजी-आजोबांचा दिवस. हजारो वर्षांपासून जगभरात अस्तित्वात असलेल्या माता आणि मातृत्वाच्या अनेक पारंपारिक उत्सवांशी त्याचा थेट संबंध नाही, जसे की ग्रीक पंथ ते सायबेले, मातृदेवता रिया, हिलारियाचा रोमन सण किंवा इतर ख्रिश्चन धर्मगुरू मदरिंग रविवारचा उत्सव मदर चर्चच्या प्रतिमेशी संबंधित आहे. तथापि, काही देशांमध्ये 'मातृदिन' अजूनही या जुन्या परंपरांचा समानार्थी आहे.

आई म्हणजे ममता, तसेच आई म्हणजे आत्मा आणि आई म्हणजे ईश्वर या दोघांचा संगम म्हणजे 'आई' होय. मायेची पाखरण करणारी एक स्त्री. एखादी स्त्री जेव्हा



आपल्या अपत्यास जन्म देते त्यावेळेस तिला मातृत्व प्राप्त होते आणि तेव्हाच समाजाच्या दृष्टीने ती त्या अपत्याची आई बनते. आईचे खरे प्रेम आणि पालनपोषण या सोबत कशाचीही तुलना केली जाऊ शकत नाही. आमच्या आयुष्यातील ती एकमेव महिला आहे जी कोणत्याही हेतूशिवाय आपल्या मुलांवर भरपूर प्रेम करते. मूल म्हणजे आईसाठी सर्वस्व असते. ती एक चांगली श्रोता आहे आणि आम्ही सांगत असलेल्या आमच्या चांगल्या आणि वाईट गोष्टी ऐकत असते. ती आम्हाला कधीही रोखत नाही आणि कोणत्याही प्रकारे आम्हाला बांधत नाही. ती आम्हाला चांगल्या आणि वाईट मधील फरक शिकवते. आई आम्हाला प्रत्येक आनंदात आणि दुःखात मदत करते, जेव्हा आपण आजारी असतो, तेव्हा ती आपल्यासाठी रात्रभर जागी राहुन आपल्या चांगल्या आरोग्यासाठी देवाची प्रार्थना करते.

शब्द मानवी भावनांशी निगडित असून त्यास माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. स्त्रीने जन्म दिला नसतानाही ती सवतीच्या मुलाची किंवा दत्तक मुलाची आई बनते. आई ही शांतादुर्गाचे रूप आहे, मराठी भाषेतला 'आई' हा आई मायेचा सागर आहे. मराठीतील प्रसिद्ध कवी यशवंत यांनी आपल्या कवितेत 'स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी' ही ओळ लिहून 'आई' या शब्दाची महानताच थोडक्यात सांगीतले. आजच्या दिनी सर्वांना 'मदर्स डे' च्या शुभेच्छा!

**घर सुटतं पण आठवण कधीच सुटत नाही !**
**जीवनात आई नावाचं पान कधीच मिटत नाही !**

**प्रविण बागडे, नागपूर**
**मो. ९९२३६२०९१९**

# आई प्रत्येकाची मायेचा सागर...

११ मे या दिवशी जागतिक मातृदिन... खरेतर आईमुळे आपल्यासाठी वर्षातील प्रत्येक दिवस हा सुवर्ण दिवस असतो... आईची माया आणि आईची महती शब्दसागरात मावत नाही... आईचे हळवे मन आणि अंतरिक ममता दुसऱ्या कोणाकडे नसते...आईचे मन आकाशाएवढे विशाल असते आपले सगळे गुन्हे त्यात अलगद मावतात...प्रसंगी आई रागावते कधी क्षणिक अबोला धरते पण आपल्या सगळ्यांची काळजी करत ती नेहमी झुरत असते...आई घरात, दारात,अंगणात,समाजात,गावात, शेतात आणि प्रत्येक क्षेत्रात तिच्या त्यागामुळे व कष्टामुळे शोभून दिसते...आईमुळे हे विश्व सुखद, सुंदर,मनमोहक,दिलखुलास आणि उठावदार दिसते...आई घरातील सगळी कामे करते,आईने केलेल्या स्वयंपाकाची गोडी आणि चव जिभेवर रेंगाळत असते...आई घरात रांदते,बापाबरोबर शेतात राबते,कष्टाची कामे करते...ती कधी थकत नाही,दमत नाही आणि कधी आजारी पडत नाही...कधी काळी आई आजारी पडली तर एका गोळीने तिचा आजार छू मंतर होतो... कारण तिला माहीत असते ती आजारी पडली तर सारे घर आजारी पडते....

अनेक लेखकांनी आई शब्दांत रेखाटली,नामवंत कवींनी आईवर अनेक सुहृदयी काव्ये लिहिली पण आईचे संपूर्ण गोडवे कोणीही गाऊ शकत नाही,शब्दबद्ध करू शकत नाही.साने गुरुजींची आई आपण 'श्यामची आई' पुस्तकात वाचताना ढसाढसा रडतो,यशवंत मनोहर यांच्या 'रमाई' पुस्तकात नवकोटी बहुजनांची आई रमाई आपला जीव की प्राण बनतात,राजमाता जिजाऊ व्यापक दूरदृष्टी बाळगून रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना स्वराज्य स्थापनेसाठी प्रेरित करतात, डोंगरदऱ्यांवरून धाडसाने उतरत घसरत बाळासाठी घराकडे धाव घेणारी हिरकणी सर्वांच्या हृदयाचा ठाव घेते...आई ही अशी असते... तुमची माझी सगळ्यांची सारखी असते...ती मायेचा सागर असते... आपल्या लेकरांबाळांसाठी जीवन अर्पण करते...आई ही आईच असते,तिच्या सारखे कोमल हृदय आणि भावनिक मन अन्य कोणाकडे नसते...

म्हणून आईला कधी रागावू नका,तिचे मन दुखवू नका,चुकून आईला कधी रागावलात तर लगेच क्षमा मागा ती लगेच माफ करते. आणि हसून तुम्हाला जवळ घेते. कधी तुम्ही कमी जेवलात तर ती तुमची काळजी करते. सणावाराच्या दिवशी पुरणपोळीचा स्वयंपाक आपण जेवल्याशिवाय तिच्या घशाखाली उतरत नाही.आई कधी स्वतःची काळजी करत नाही. पण घरातील सर्व नातेवाईकांच्या काळजीचे कंत्राट तिने स्वतःकडे कायम स्वरुपी घेतलेले असते. मुलगी,नात,भाच्ची,पत्नी,भावजय,आई,सासू,आत्या,नणंद,जाऊ,मामी, आजी सासू अशा कितीतरी भूमिका चोखपणे पार पाडणारी आपल्या सगळ्यांची आई साऱ्या जगाचे एक अद्भुत आणि अद्वितीय वैभव आहे.आईचे महत्त्व आईविना पोरके झालेल्या लहान बाळांना विचारा...मन सुन्न होते,हृदयाला छिद्र पडतात...

**माझ्या सारख्या पामराने**
**आईची महती वर्णावी किती**
**सागराएवढी शाई पुरत नाही**
**आकाशाएवढा कागद उरत नाही**
**आई पूर्णतः कधी उमजत नसते**
**तिची ती माया अगाध असते आईविना**
**जीवनात अंधार पसरतो**
**आईमुळेच जीवनाला अर्थ येतो...**

**मातृदिनानिमित्त जगातील सर्व आईंना कोटी कोटी वंदन!**

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९५४५४४२६४८.**

## कोल्हेकुई

**भडकले जसे युध्द**
**धास्तावे कोल्हेकुई**
**पीओके मधूनपळा**
**पडणारं थोडी भुई**

**डळमळे अर्थस्थिती**
**बे काबू ती महागाई**
**भुकेने पाक झोपेना**
**काय गाणारं अंगाई**

**समस्त विश्वा ठराव**
**दहशतवादासमनाई**
**जहन्नुममधे जाताना**
**कुणी ना उरला भाई**

**बेरहम क्रूर रे हत्यारा**
**कत्तल खान्यात गाई**
**भोगतो पापाचीफळे**
**कापला गेला कसाई**

**अणूबाँब हल्ला करु**
**मारतोबाष्कळबढाई**
**उध्वस्तले विमानतळे**
**करणारं हवाई चढाई**

**मनोबल खच्चीकरण**
**जिंकाया चाले लढाई**
**सपशेलमाघार घेण्या**
**आहे बा भली भलाई**

**अख्खा पाक फाटला**
**कुठेकशी करे शिलाई**
**आता चिणा मोगलाई**
**सज्ज भारतीयशिवाई**

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक बातमी... अचूक बातमी

# राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन

आज ११ मे, आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास महामंडळ ( टी डी बी ) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदशनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या. दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या. अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती. १९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक ( कोडवर्ड ) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला.... ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला... २४ वर्षांनंतर भारताने जमिनीखालुन प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला. ही अणूचाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या अणूचाचणीचा सुगावा लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या ( सीएसआयआर ) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज ( एनएएल ) ने विकसित केले होते. तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना ( डीआरडीओ ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्राला तिहेरी मुकुट व बारामतीच्या खेळाडूंनी मारली बाजी

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१०, बारामती :** कर्नाटक राज्यात झालेल्या राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्रराज्य पुरूष संघाने अप्रतिम खेळ करत, छत्तीसगड, गोवा, बिहार, कर्नाटक, पुदुचेरी आणि अंतिम फेरीत हरीयाणाचा पराभव करत सुवर्णपदकावर नाव कोरले व विजेतेपद प्राप्त करत सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच महाराष्ट्र महीला संघाने रौप्यपदक मिळवले असुन तर मिश्र संघाने कास्यपदक पटकावत तिहेरी यश संपादन केले.

या संघात खेळाडू म्हणून सामाजिक कार्यकर्ते मुनिर तांबोळी यांचे चिरंजीव बारामतीचे आयान मुनिर तांबोळी यांच्यासह सिद्धेश दरेकर, हर्ष यादव, रणवीर गुळूमकर तसेच बारामतीची महीला संघाची खेळाडू प्रतिनिधी मेहरूनीसा तसलिम शेख हिने संघाचे उपकर्णधारपद




निभावले.

या बारामतीच्या सर्व खेळाडूंनी भाग घेऊन महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून उत्तम खेळाडू म्हणून महाराष्ट्रराज्य संघास प्रथम सुवर्णपदक तसेच रौप्यपदक, व संमिश्र टीमने कास्यपदक मिळवून दिले व राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्राला तिहेरी मुकुट मिळवून देत मानाचा तुरा रोवला व डॉजबॉल टीममध्ये बारामतीचे नावलौकिक केले. या सर्व खेळाडूंवर नागरिकांकडून अभिनंदनचा वर्षा होत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# ई- बाईक टॅक्सी विरोधात रिक्षा, टॅक्सी चालकांचा २१ मे रोजी राज्यव्यापी बंद

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१०, मुंबई :** महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेतर्फे येत्या २१ मे रोजी राज्यव्यापी बंदची हाक देत मोठं आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. ई- बाईक टॅक्सीला महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेचा तीव्र विरोध दर्शवला असून या निर्णयविरोधात राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर २१ मे रोजी निषेध आंदोलन करणार असल्याची माहिती समोर आली आहे. ई-बाईक टॅक्सीमुळे १५ लाख रिक्षा चालकांचा रोजगार धोक्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. शासनाने ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याआधी संघटनेबरोबर चर्चा करणे आवश्यक होतं, अशी मागणी संघटनेने केली आहे.

दरम्यान महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यात ई-बाईक टॅक्सीला दिलेली मंजूरी तातडीने रद्द करण्यात यावी. या करिता दि.२१ मे २०२५ रोजी ऑटोरिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्रच्या सर्व संलग्नीत संघटनांद्वारे महाराष्ट्रातील सर्व आरटीओ कार्यालयासमोर निदर्शने केली जातील. असे ऑटो रिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समितीने त्यांच्या पत्रात म्हंटले आहे.

बेरोजगार युवकांना स्वयंरोजगाराची संधी देण्याच्या नावाखाली महाराष्ट्र राज्य सरकारने ई-बाईक टॅक्सीला परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. ई-बाईक टॅक्सी आणावी किंवा नाही या करिता राज्य शासनाकडून नेमलेल्या समितीसमोर आमच्या संघटनेमार्फत ई-बाईक टॅक्सीला विरोध करण्यात आला.




तसेच त्याचे कारण ही समितीसमोर मांडण्यात आले. महाराष्ट्र शासनाने ई-बाईक टॅक्सी या सेवेला परवानगी देणे अगोदर आमच्या संघटने बरोबर चर्चा करणे आवश्यक होते, परंतु महाराष्ट्र राज्य शासनाने एकतर्फी निर्णय घेत ई-बाईक टॅक्सीला परवानगी दिली. ई-बाईक टॅक्सी /बाईक पुलींग सुरू झाल्यास महाराष्ट्रातील १५ लाख रिक्षाचालकांचा रोजगार धोक्यात येणार आहे. असेही संघटनेमार्फत सांगण्यात आले आहे.

दरम्यान महाराष्ट्रातील मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील शहरे आणि ग्रामिण विभागातील ऑटोरिक्षा संघटनांचे सर्व प्रमुखांची बैठक रविवार, दि. २७ एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राज्य शासनाच्या या अन्यायकारक निर्णया विरोधात दि.२१ मे २०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्व आरटीओ कार्यालयासमोर निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, या निर्णयाचा फटका सर्वसामान्य प्रवाश्यांना बसण्याची शक्यता आहे. दुसरीकडे प्रशासन या बाबत नेमकं काय पाऊले उचलतं हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे.

# जबाबदारीचे वार्तांकन : माध्यमांची भूमिका आणि जनतेचे कर्तव्य

‘ऑपरेशन सिंदूर’ निष्पाप बळींना न्याय देण्यासाठी सुरू झाले. दिनांक ६- ७ मे च्या मध्यरात्री भारताने पाकिस्तानच्या नऊ दहशतवादी तळांवर हल्ले केले. यानंतर पाकिस्तानने दुसऱ्या दिवशी, म्हणजे गुरुवार दिनांक ८ मे रोजी सायंकाळी, भारतावर ड्रोन व हलक्या क्षेपणास्त्राद्वारे हल्ले केले.यात भारतीय लष्करी आस्थापनांना लक्ष्य केले गेले, मात्र हे सर्व हल्ले यशस्वीपणे परतावून लावण्यात आले.




८ मेच्या रात्री, इलेक्ट्रॉनिक माध्यमे कमालीच्या उतावळेपणाने समालोचन करत होती. काही वृत्तवाहिन्यांनी भारतीय नौदलाकडून कराची उद्ध्वस्त झाल्याच्या बातम्या दिल्या. पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांना हटवण्यात आले , असे काही वाहिन्यांनी ब्रेकिंग न्यूज दिल्या. त्यांच्या बदली पाकिस्तानच्या लष्कराची सूत्रे ज्या व्यक्तीकडे आली, त्याचे नावही जाहीर करण्यात आले.

काहींच्या मते, भारतीय जवानांनी एलओसी ओलांडून एकामागोमाग एक पाकिस्तानी शहरे ताब्यात घेण्यास सुरुवात केली आहे, असे क्रिकेट समालोचकाप्रमाणे उंच आवाजात सांगण्यास सुरुवात केली. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी राजीनामा दिला आहे, असे देखील काही वृत्तवाहिन्यांनी सांगितले. इस्लामाबाद, लाहोर, कराची, रावळपिंडी, सियालकोट ही शहरे भारताच्या ताब्यात गेली आहेत, असे स्टुडिओत बसून महाभारतातील दिव्यदृष्टी प्राप्त झालेल्या संजयप्रमाणे काहीजण वर्णन करु लागले .

लष्कर, हवाई दल व नौदल अशा तिन्ही दलांनी पाकिस्तानला नेस्तनाबूत केले, असे सांगून काही न्यूज चॅनेल्सनी युद्धाचा निकालच लावून टाकला.

शेवटी, दुसऱ्या दिवशी संरक्षण मंत्रालयाला सूचनावली जारी करावी लागली. त्यात स्पष्टपणे नमूद केले की, जबाबदारीने वार्तांकन करावे. कोणत्याही परिस्थितीत सैन्यदलांची कारवाई योजना किंवा हालचाल शत्रूच्या नजरेस पडेल अशा प्रकारे दृश्ये दाखवू नयेत. कारगिल युद्ध आणि मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या वेळीही असेच झाले होते; हे लक्षात ठेवावे.

जणू काही दोन संघांमध्ये एखाद्या खेळाचा सामना चालू आहे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे त्याचे धावते वर्णन करत आहेत असे चित्र निर्माण केले जात आहे . खरंतर, माध्यमांनी जनतेला वस्तुनिष्ठ आणि अचूक माहिती पुरवायला हवी. विश्लेषण तज्ज्ञांच्या मदतीने केले गेले पाहिजे. काही न्यूज चॅनेल्स हे जाणीवपूर्वक करत आहेत.

सत्य हे तत्त्वचर्चेतील अंतिम व प्रखर मूल्य असते. महात्मा गांधी म्हणतात, सत्य म्हणजे परमेश्वर. सत्याचा पाठपुरावा करणे हे माध्यमांचे प्राथमिक मूल्य असले पाहिजे. मात्र, कधी कधी सर्वसामान्य जनतेला सत्य सांगणे हितावह नसते. घबराट निर्माण होईल किंवा आत्मविश्वास ढासळेल, अशा घटना कधी कधी झाकून ठेवाव्या लागतात – अर्थात व्यापक जनहित लक्षात घेऊन. अशा संघर्ष काळात भारतीय सेनेकडून दररोज वस्तुनिष्ठ माहिती देणारे बुलेटिन प्रसिद्ध केले जाते. नागरिकांनी याच बुलेटिनला प्रमाण मानणे हे आजच्या घडीला सुयोग्य ठरेल. ब्रेकिंग न्यूज, सबसे तेज, सनसनाटी अशा अतिरंजीत माहितीसाठी सुरु झालेली स्पर्धा ही माध्यमांना आत्मपरीक्षणासाठी भाग पाडणारी आहे. टीआरपीसाठी सणसणाटीपणा किती वाढवायचा, याला मर्यादा आता ठरवणे आवश्यक झाले आहे.

शासनाने जे तारतम्य बाळगून वार्तांकन करण्याच्या सूचना माध्यमांना दिल्या आहेत, त्यांचे काटेकोर पालन करणे हे त्यांच्या स्वतःच्या विश्वासार्हतेसाठी आवश्यक आहे.मुद्रित माध्यमांनी जे भान राखले आहे, ते इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी देखील दाखवले पाहिजे.संघर्ष काळात जनतेला विश्वासार्ह माहिती हवी असते. पण या काळात सर्वप्रथम बळी ठरतो तो खऱ्या माहितीचा. समाजमाध्यमांतून खोट्या माहितीतून महापूर येत आहे. अर्धसत्य, अर्धवट किंवा पूर्ण खोट्या बातम्यांमुळे जनमत भ्रमित होऊ नये, यासाठी शासनाला जागरूक राहावे लागत आहे. त्यामुळे, आजच्या घडीला, येणाऱ्या प्रत्येक माहितीकडे साशंकतेने पाहणे आणि त्याची खातरजमा करणे हे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य झाले आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२४१**

# ‘आपले सरकार सेवा केंद्रा’ वरील दरवाढ तात्काळ मागे घ्या : खा.प्रतिभा धानोरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** ‘आपले सरकार सेवा केंद्रा’ मार्फत पुरवल्या जाणाऱ्या अत्यावश्यक शासकीय सेवांच्या शुल्कात नुकत्याच झालेल्या मोठ्या दरवाढीवर चिंता व्यक्त करण्यात येत आहे. या दरवाढीवर तातडीने पुनर्विचार करुन ती मागे घेण्याची मागणी खा. प्रतिभा धानोरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र पाठवून केली आहे.

खा. धानोरकर यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे कि, राज्य शासनाने ’ आपले सरकार सेवा केंद्रा ’ वरील जवळपास सर्वच सेवांच्या शुल्कात ६० रु ते १०० रु पर्यंत वाढ केली आहे. ही दरवाढ अशावेळी करण्यात आली आह, जेव्हा सर्वसामान्य नागरिक महागाईने त्रस्त आहेत.

ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, महिला, मजूर आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ही दरवाढ आर्थिकदृष्ट्या अत्यंत अन्यायकारक आणि त्रासदायक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सध्या विविध शैक्षणिक परीक्षकांचे निकाल जाहीर झाले असून विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी सेतू केंद्रावर मोठी गर्दी होत आहे. तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनाही विविध कागदपत्रांची गरज भासत असते.



अशा परिस्थितीत या अत्यावश्यक सेवांसाठी वाढलेले शुल्क त्यांच्यासाठी मोठा आर्थिक भार ठरत आहे, असे खासदार धानोरकर यांनी निदर्शनास आणले.

खासदार धानोरकर यांनी शासनाच्या ई-गव्हर्नन्स’ आणि ‘सुलभ प्रशासन’ या धोरणांचा उल्लेख करत ही दरवाढ या धोरणांच्या विरोधात असल्याचे सांगितले. त्यांनी मागणी केली आहे की, राज्य सरकारने तातडीने वाढविलेले सेवा शुल्क मागे घ्यावे. तसेच भविष्यात सेवा शुल्क निश्चित करण्यापूर्वी जनतेच्या प्रतिनिधींशी विचारविनिमय करावा. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सेवा शुल्कात सवलतीची तरतुद करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या गंभीर विषयावर तातडीने कार्यवाही करण्याची अपेक्षा खा. प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केली आहे.

# ठाणे आरटीओकडून शिळ फाटा ते दिवा मार्गावर कारवाई

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, शिळफाटा (ठाणे) :** आज दुपारी ४:०० ते ५:०० च्या वाजण्याच्या सुमारास शिळ दिवा मार्गावर ठाणे आरटीओ कडून कारवाई करण्यात आली. २ रिक्षा चालकांना १८ हजार ५०० च्या वर दंड ठोकण्यात आला. आरटीओ चा दंड पाहता सर्व रिक्षा चालक घरी गेले. या मार्गावर शेअरिंग रिक्षा या चालत असतात.

शेअरिंग रिक्षामुळे प्रवासांचे दोन पैसे हे बचत होत असते. त्यामुळे शेअरिंग रिक्षामध्ये प्रवासी हे जात असतात. अचानक आरटीओची कारवाई झाल्यामुळे सर्व रिक्षा घरी गेल्यामुळे प्रवाशांचे हाल



झाले. १८,७५० रुपये एवढा दंड आरटीओ कडून रिक्षा चालकांना देण्यात आल्यामुळे रिक्षा चालक घरी जाऊन झोपला. धंदा कराचे की नाही हा प्रश्न रिक्षा चालकांपुढे आता उभा राहिला आहे. रिक्षाचालकांपुढे आता आत्महत्या करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. रिक्षा चालवायचा की नाही हा ही प्रश्न आता रिक्षा चालकांना पडला आहे.

आरटीओ अधिकारी दिवा स्टेशन, आगासन फाटक, दातिवली, मुंब्रा कॉलनी या भागांमध्ये कारवाई न करता फक्त शिळ दिवा रोडवर कारवाई केली. कारण त्या भागामध्ये काही संघटना चे पदाधिकारी आरटीओ ला हप्ता देत असल्यामुळे त्या भागामध्ये कारवाई अधिकाऱ्यांनी केली नाही. अमोल खेडकर हा अधिकारी कारवाई करण्यासाठी आला होता. जर अधिकारी हा हप्ता घेत नसेल तर दिवा स्टेशन आणि बाकीच्या परिसरामध्ये कारवाई करणार का?

# थोडक्यात

## अहिल्यानगर जिल्ह्याला यलो अलर्ट जारी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, अहिल्यानगर :** महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा इशारा अजूनही कायम असून, हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. सध्या कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या भागांमध्ये पावसाचे ढग सक्रिय आहेत. त्यामुळे येत्या चार दिवसात वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्यापावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यात अवकाळी पावसाचा मुक्काम अजून वाढणार आहे. दिनांक १० मे २०२५ रोजी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, पुणे, नाशिक, अहमदनगर (अहिल्यानगर), संभाजीनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोलीसाठी हवामान विभागाने चार दिवसांसाठी ‘यलो अलर्ट’ जारी केला आहे. तसेच कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दिनांक ११ मे २०२५ राज्याच्या बहुतांश भागांत पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच १२ मे संपूर्ण विदर्भात यलो अलर्ट तसेच मध्य महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांतही यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## कल्याणमध्ये ऑल आऊट कोम्बींग ऑपरेशन

### गुन्हेगारीवर कडक कारवाई; २५ गुन्हे दाखल

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१०, कल्याण (ठाणे) :** पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांच्या आदेशानुसार परिमंडळ ३ कल्याण हद्दीतील कल्याण व डोंबिवली शहरांमध्ये दिनांक ९ मे २०२५ च्या रात्री ११ ते दिनांक १० मे २०२५ च्या पहाटे १ वाजेपर्यंत ऑल आऊट कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. या विशेष मोहीमेमध्ये एकूण २५ गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्हेगारीवर ठोस आळा घालण्यासाठी ही कारवाई मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. या ऑपरेशनमध्ये परिमंडळ ३ अंतर्गत ४७ पोलीस अधिकारी आणि २०८ पोलीस अमलदार सहभागी झाले होते. खालीलप्रमाणे विविध स्वरूपातील कारवाई करण्यात आली :-

*** शस्त्र जप्ती (भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५)) – ०३ प्रकरणे * अवैध धंद्यावर कारवाई – ०९ * दारू विक्री संबंधित कारवाई – ०६ * दारूबंदी कारवाई – ०३ * तंबाखूजन्य पदार्थ विक्री (कोप्पा) अंतर्गत – २६ प्रकरणे * प्रतिबंधात्मक कारवाई – ८८ * म.पोलीस कायदा कलम १४२ अंतर्गत – ०२ * अंमली पदार्थ संबंधित गुन्हे – ०७ * अंमली पदार्थ सेवन प्रकरणे – ०७**

या व्यतिरिक्त फरार आरोपी, पाहिजे आरोपी, गुंड, हिस्ट्रीशिटर आणि हद्दपार इसमांची तपासणी करण्यात आली. संपूर्ण कारवाईदरम्यान १० ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती. नाकाबंदी दरम्यान २७६ वाहने तपासण्यात आली, यापैकी ६६ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करत ७८,७००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

## सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न संवेदनशीलपणे सोडवा - शेरसिंग डागोर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** सफाई कर्मचारी हा अतिशय गरीब वर्ग आहे. शहर स्वच्छतेत त्याची मोलाची भूमिका असते. तो आपले काम अतिशय प्रामाणिकपणे करतो. या कामाच्या भरवशावर स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वच्छतेचे पुरस्कार मिळतात. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांच्या कामांची जाणिव ठेवून अधिकाऱ्यांनी त्यांच्या अडीअडचणी सकारात्मकतेने आणि संवेदनशीलपणे सोडवाव्यात, अशा सूचना राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग डागोर यांनी केल्या. सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत नियोजन सभागृह येथे दिनांक ०९ मी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, पालिका प्रशासन अधिकारी डॉ.विद्या गायकवाड आदी उपस्थित होते.

कोरोना काळात जीवावर उदार होऊन सफाई कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम केले, असे सांगून डागोर म्हणाले, विविध आस्थापनांमध्ये वारसान तत्वावर सफाई कर्मचाऱ्यांच्या नोकरी संदर्भात तात्काळ निर्णय घेऊन त्यांना रुजू करुन घ्यावे. शासन निर्णयानुसार नियुक्तीची जी मुदत आहे, त्या कालावधीत सफाई कर्मचाऱ्यांना नियुक्ती देणे बंधनकारक आहे. श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांच्या घरकुलासाठी प्रस्ताव घेऊन त्यांना घरे उपलब्ध करुन द्यावीत. तसेच जमिनीचे पट्टे सुध्दा देण्यात यावे. पुढे ते म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांची नियमितपणे आरोग्य तपासणी करावी. त्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतने आरोग्य शिबिराचे आयोजन करावे. तसेच यात अशासकीय सदस्यांचा समावेश असावा, अशा सूचना अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केल्या. बैठकीला जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळुंके, नुतन सावंत यांच्यासह सर्व नगरपालिका, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

## वाहतूक कोंडीपासून सुटकारासाठी प्रशासनाने हे उपाय करावे; ग्रामस्थांची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, शिळफाटा, (ठाणे) :** लग्नाचे हॉल, हॉटेल, रेस्टॉरंट, छोट्या कॅन्टीन, चहाच्या टपऱ्या, पान टपरी, धाबे, या सर्व ठिकाणी चहापाण्यासाठी, जेवण करण्यासाठी पान खाण्यासाठी, धूम्रपान करण्यासाठी वाहने पार्किंग केल्या जातात. तासनं तास तिथे वाहने उभे केल्यामुळे वाहतुकीस अडथळा होतो. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. लग्नाचे हॉल, रेस्टॉरंट, बार, हॉटेल या ठिकाणी सुरक्षा रक्षक जर मालकांनी ठेवले आणि वाहन चालकांना जर सूचना दिल्या तर वाहन चालक आपली वाहन जास्त काल तिथे पार्किंग करणार नाहीत. या ठिकाणी सुरक्षारक्षक नसेल तर पोलीस प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई करावी. लायसन हे रद्द करावे. यासाठी पोलीस प्रशासन पावले उचलणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहेत.

रस्त्याच्या कडेला असणारे गॅरेज, सर्विस सेंटर, रस्त्यावर लावणारे हात गाड्या, भंगारवाले यांच्यावर पालिका प्रशासनाने कारवाई करून त्यांना दंड देण्यात यावा आणि गुन्हा ही दाखल करण्यात यावा. जेणेकरून पुन्हा त्या रस्त्यावर हात गाड्या दिसणार नाहीत. गॅरेज आणि सर्विस सेंटर यांच्यावर जर कारवाई केली तर वाहन दुरुस्ती करण्यासाठी ज्या पार्किंग वाहन करण्यात येतात त्या सुद्धा आपल्याला दिसणार नाहीत. महानगरपालिका प्रशासन असे करणार का ?